अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# आंध्रच्या विभाजनाबरोबर काँग्रेसचेही विभाजन

भारताच्या संसदीय इतिहासामध्ये ज्याचे अतिशय लांछनास्पद असे वर्णन करावे लागेल तो प्रकार तेलंगण प्रश्नावरून घडलेला आहे. आंध्र प्रदेशचे विभाजन करून स्वतंत्र तेलंगण राज्य निर्माण करण्याचा ठराव लोकसभेमध्ये जवळपास एकतर्फी पध्दतीने मंजूर केला गेला. ज्यादिवशी या संदर्भातले विधेयक लोकसभेत चर्चेला ठेवले गेले. त्याला विरोध करताना संयुक्त आंध्र प्रदेशच्या बाजूने असलेल्या खासदारांनी सगळे सभागृह जवळपास डोक्यावर घेतले होते. हा ठराव मंजूर होऊ नये म्हणून गोंधळ तर घातला गेलाच, त्याशिवाय मिर्चीपूड असलेले फवारे सभागृहात मारले गेले. आता सरकारच्या या आंध्रविरोधी धोरणाचा निषेध म्हणून राज्यसभेतदेखील गदारोळ झाला. आता तर काँग्रेसचेच खासदार असलेल्या सातजणांनी राजीनामे दिले आहेत. मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसच्या हायकमांडने ज्यांची नियुक्ती केली होती त्या रेड्डींनीसुध्दा राजीनामा देऊन आपला तेलंगण विरोध जाहीर केला आहे. भाषिक प्रांतरचना करताना पूर्वीपासूनच अशा प्रकारच्या समस्या उद्भवत राहिल्या. मात्र प्रत्येक वेळी शक्य तितक्या सामंजस्याने निर्णय घेण्याचा प्रयत्न केला गेला. तेलंगणाच्या बाबतीत मात्र अशा प्रकारचे सामंजस्य निर्माण करण्यात केंद्र सरकारला अपयश आले, असेच म्हणावे लागेल. केवळ लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हे विभाजन करून आपल्या जागा टिकवण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला आहे. राजकीय हेतू मनामध्ये ठेवूनच विभाजनाचे हे विधेयक मोठ्या घाईगर्दीने मंजूर करून घेतले. सरकारच्या या इतक्या घाईगर्दीला भारतीय जनता पार्टीसारख्या विरोधी पक्षानेदेखील पाठिंबा द्यावा याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. आज छोटी राज्ये निर्माण झाली पाहिजेत. ही गोष्ट जरी खरी असली तरी एकूण त्या राज्यातील जनभावनांचा तितक्याच गांभीर्याने विचार झाला पाहिजे. तेलंगणच्या प्रश्नावर दोन्हीकडची मते अत्यंत आक्रमक स्वरूपाची होती. के. चंद्रशेखर राव यांनी स्वतंत्र तेलंगणासाठी थेट आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता. तिथल्या आंदोलनाचा भडका इतक्या प्रचंड प्रमाणात होता की, सरकारला या आंदोलनापुढे हात टेकावे लागले. मात्र या स्वतंत्र तेलंगणाचा काँग्रेस स्वत:साठी वापर करून घेत असल्याचा थेट आरोप अनेक वर्षे तिथे मुख्यमंत्री राहिलेल्या वाय. एस. रेड्डी यांचा मुलगा जगन यांनी केला आहे. काँग्रेसमध्येच या विषयावरून सरळ सरळ दोन गट पडले आहेत. आंध्रप्रदेशात आपल्याला अपेक्षेप्रमाणे जागा मिळत नाहीत, हे लक्षात आल्याबरोबर स्वतंत्र तेलंगण झाला तर आपल्या थोड्याफार तरी जागा शिल्लक राहतील, असा एकच हेतू त्यामागे ठेवला गेला आहे.

### केवळ राजकीय हेतू

आज भलेही स्वतंत्र तेलंगण जरी निर्माण होत असला तरी आंध्र प्रदेशमधल्या प्रादेशिक संघर्षाचा फार मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. कारण या तेलंगण निर्मितीमागे स्थानिक जनतेच्या भावनांपेक्षाही राजकीय हडेलहप्पीने सर्वात जास्त कुरघोडी केलेली दिसून येते. स्वतंत्र तेलंगणची मागणी खूप जुनी आहे. कदाचित काळानुसार त्याची आवश्यकताही निर्माण झाली असती. पण त्याकरिता देशाचे सर्वोच्च आणि सार्वभौम व्यासपीठ असलेल्या संसदेने अधिक समन्वयाची भूमिका घेणे अपेक्षित होते. अनेक वेळेला उठसुट संसदीय समित्या स्थापन करण्याची मागणी करणाऱ्या खासदारांनी तेलंगण प्रश्नी मौन का बाळगले. एखादी चांगली समिती स्थापन करून आंध्र प्रदेशच्या विभाजनाबाबत सामंजस्य निर्माण करण्याचा परिपक्वपणा या संसदीय समितीच्या माध्यमातून दाखवता आला असता. केवळ आंदोलनाच्या भाषेला बळी न पडता दोन्ही बाजू ऐकून घेण्याचे काम केंद्र सरकारने करायला हवे होते. त्याकडे निश्चितपणे दुर्लक्ष झाले. विशेषत: आंध्रचे त्यावेळचे मुख्यमंत्री वाय. एस. आर. यांचे अपघाती निधन झाल्यानंतर काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आणि त्याचकाळात तेलंगणाच्या मागणीनेही जोर धरला. या दोन आघाड्यांवर काँग्रेसची स्थिती कमकुवत पडत गेल्यामुळेच केंद्र सरकारने तेलंगणचा मुद्दा राजकीय अंगाने पुढे आणला. अजूनही काँग्रेसला असे वाटते की, आंध्र प्रदेशात आपले फारसे नुकसान होणार नाही आणि तेलंगणामधून आपण आपले स्थानही टिकवून ठेवू शकू. परंतु संसदेमध्ये ज्या पध्दतीने तेलंगणविरोधात खासदारांनी आक्रमकपणा दाखवला त्यावरुन निदान आंध्र प्रदेशात तरी काँग्रेसला फारशा आशा उरलेल्या नाहीत. यातला राजकीय हडेलहप्पीचा भाग सोडून दिला तर एकूणच देशातल्या विविध प्रदेशांमधली स्थानिक अस्मिता योग्य पध्दतीने केंद्राकडून सांभाळली जात नाही, यावर प्रकाश पडतो. गेल्या काही वर्षांपासून स्वतंत्र तेलंगणसाठी आंदोलन होत राहिले. परंतु एकसंध आंध्र प्रदेश ज्यांना अपेक्षित आहे त्यांना स्वतंत्र तेलंगण निर्माण होणार नाही असेच वाटत होते. केंद्र सरकारदेखील त्यासाठी अशा प्रकारची घाईगर्दी करेल, असेदेखील त्यांना वाटले नव्हते.

### भाजपा आणि स्वतंत्र विदर्भ

भारतीय जनता पार्टीने याच राजकीय हेतूने स्वतंत्र तेलंगणला मान्यता दिली आहे. भारतीय जनता पार्टी नेहमीच छोट्या नेत्यांची बाजू घेत आली. एनडीएच्या कार्यकाळात छत्तीसगढ, उत्तराखंड आणि झारखंड या छोट्या राज्यांची निर्मिती झाली. त्यामागे भौगोलिक कारण जास्त प्रभावी होते. देशातले सर्वात मोठे राज्य म्हणून उत्तर प्रदेश गणले जात असे. परंतु तिथला राज्यकारभार नेहमीच अस्ताव्यस्त होत राहिला. उत्तराखंडच्या निर्मितीतून राज्यकारभार थोडा आवाक्यात आणला गेला. परंतु छोट्या राज्यांचे हे समीकरण महाराष्ट्रातही लागू पडू शकते. कारण आज स्वतंत्र विदर्भाची मागणीदेखील तितक्याच आग्रहाने केली जात आहे. काँग्रेसने स्वतंत्र विदर्भाचा ठराव केला तर त्याला भाजपा पाठिंबा देईल, असे वेळ मारून नेणारे आश्वासन अनेक वेळा भाजपाकडून दिले गेले. परंतु उद्या जर का केंद्रात एनडीएचे सरकार आले तर स्वतंत्र विदर्भाला हा पक्ष मान्यता देणार आहे का? तेलंगणच्या बाबतीत तर आंध्रप्रदेशच्या विभाजनाचा ठरावही विधानसभेत मंजूर झालेला नाही. महाराष्ट्रात स्वतंत्र विदर्भाचा ठराव विधानसभेत मंजूर झाला तर भाजपा त्याला पाठिंबा देईल, या आश्वासनामध्ये भाजपाचाही राजकीय हडेलहप्पीपणाही दिसून येतो. यानिमित्ताने एकूणच प्रादेशिक अस्मिता आणि केंद्राकडून त्याचा होणारा राजकीय वापर पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला आहे. आंध्रचे विभाजन त्या प्रदेशात काँग्रेसचेही विभाजन करणारे ठरेल, यात काही शंका उरलेली नाही.